सकाळ

# रत्नागिरीत बंदिवानांसाठी प्लम्बिंगचे प्रशिक्षण

## मुकुल माधव फाउंडेशनचा पुढाकार; भविष्यासाठी रोजगाराची संधी

■ सकाळ वृत्तसेवा

**रत्नागिरी, ता. १६ : कारागृह हे केवळ शिक्षा भोगण्याचे ठिकाण नसून व्यक्तीच्या आयुष्यातील नव्या सुरुवातीचे केंद्र असावे, या विश्वासातून फिनोलेक्स इंडस्ट्रीज सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत कार्यरत मुकुल माधव फाउंडेशनतर्फे रत्नागिरी विशेष कारागृहात बंदिवानांसाठी ८० दिवसीय प्लम्बिंगचे कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.**

हा उपक्रम मुकुल माधव फाउंडेशन, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड, रत्नागिरी कारागृह प्रशासन आणि जनशिक्षण संस्थान, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत आहे. या अंतर्गत प्लम्बिंग क्षेत्रातील व्यावहारिक व तांत्रिक ज्ञान दिले जाणार असून, प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सहभागींना स्किल इंडिया प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या कौशल्याच्या माध्यमातून कारागृहातून मुक्त झाल्यानंतर त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या उद्घाटनप्रसंगी कंपनीचे अध्यक्ष (संचालन) श्रीदत्त अलबुर, प्रकल्पाचे मानव संसाधन प्रमुख नंदकिशोर शिंपी, सागर चिवटे, आशीष आठवले, शामराव निंबाळकर आणि वरद गोरे तसेच रत्नागिरी विशेष कारागृह अधीक्षक सचिन पाटील, जनशिक्षण संस्थानच्या निधी सावंत, अमृता शेट्ये आणि सान्वी कदम, प्रशिक्षण प्रशिक्षक भिकाजी नाटेकर उपस्थित होते.

हा उपक्रम बंदिवानांच्या पुनर्वसनासाठी उपयुक्त असून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने उचललेला प्रेरणादायी उपक्रम आहे. शिक्षा ही शेवट नसून नव्या आयुष्याची सुरुवात आहे आणि कौशल्य विकास हे त्या नव्या प्रवासाचे सक्षम साधन आहे, असे फाउंडेशनच्या संस्थापक तथा फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या व्यवस्थापकीय संचालक रितू छाब्रिया यांनी सांगितले.

### विविध कारागृहांमध्ये उपक्रम

■ मुकुल माधव फाउंडेशनतर्फे पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृह, सातारा जिल्हा कारागृह, राजस्थान आणि गुजरातमधील विविध कारागृहांमध्ये शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य, स्वच्छता आणि पायाभूत सुविधा विकासाचे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. कारागृहांना केवळ बंदिस्त जागा न मानता पुनर्वसन आणि सकारात्मक परिवर्तनाची केंद्रे बनवण्याचा फाउंडेशनचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.



रत्नागिरी : मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकारातून रत्नागिरी कारागृहात प्लम्बिंग प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना अधीक्षक सचिन पाटील. सोबत श्रीदत्त अलबुर, नंदकिशोर शिंपी, सागर चिवटे, निधी सावंत आदी.